# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.
ई-मेलः mercindia@mercindia.org.in
वेब-साईट- www.mercindia.org.in

## प्रसिध्दी पत्रक

### महानिर्मिती कंपनीच्या वार्षिक महसूलाची गरज (एआरआर) आणि वीज दर (टॅरिफ) आर्थिक वर्ष २००७ करिता निश्चित करणे

महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ जून, २००५ रोजी हस्तांतरण योजना अधिसूचित केली. त्यानुसार, पूर्वीच्या मराविमंची पुनर्रचना करुन त्यांची सर्व वीज निर्मिती केंद्रे महानिर्मिती कंपनीला हस्तांतरित केली. महानिर्मिती कंपनी ही एक वीज निर्मिती कंपनी असून तिची औष्णिक विद्युत निर्मिती क्षमता ७७४८ मेगावॅट आणि जल-विद्युत निर्मिती क्षमता २३४८ मेगावॅट आहे व ही कंपनी ही महावितरण कंपनीची विजेची ठोक पुरवठादार म्हणून कार्य करते. वितरण परवानाधारकाने विद्युत निर्मिती कंपनीकडून कोणत्या दराने वीज घ्यावयाची यासह त्याच्या वीज खरेदी आणि प्राप्ती प्रक्रियेचे नियमन राज्य आयोगांनी विद्युत अधिनियम, २००३ खाली करावयाचे आहे. त्यानुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ( येथून पुढे 'आयोग' म्हणून संबोधण्यात येईल) पारदर्शकता राखण्यासाठी जाहीर प्रक्रियेचे योग्य पालन करून, महानिर्मिती कंपनीच्या सर्व वीज निर्मिती केंद्राचे वीज दर (टॅरिफ) निश्चित केले आहेत.

महानिर्मिती कंपनीने, अधिनियमाखाली अनिवार्य करण्यात आलेल्या नियामकपध्दतीचा भाग म्हणून, आर्थिक वर्ष २००५-०६ आणि २००६-०७ करिता त्यांची वार्षिक महसूलाची गरज (एआरआर) आणि वीज दर निश्चित करण्यासाठी एक याचिका प्रथमच सादर केली. आयोगाने त्यानंतर, प्रस्तावामधील आंकडेवारीतील विसंगती

आणि इतर वस्तुस्थितीदर्शक माहितीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी एक तांत्रिक तपासणी बैठक घेतली. महानिर्मिती कंपनीच्या एआरआर आणि वीज दराच्या प्रस्तावावर जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्यात आल्या. त्यानंतर, दिनांक १३ जून, २००६ रोजी याबाबत मुंबई येथे जाहीर सुनावणी घेण्यात आली. त्याशिवाय, आयोगाच्या वीज दराच्या निश्चितीकरणाच्या प्रक्रियेत विद्युत ग्राहकांच्या प्राधिकृत प्रतिनिधींचा देखील सक्रिय सहभाग होता.

आयोगाने आपल्या दिनांक ७ सप्टेंबर, २००६ च्या आदेशाने महानिर्मिती कंपनीच्या सर्व वीज निर्मिती केंद्रांचा आर्थिक वर्ष २००६-०७ करिता एआरआर आणि विजेचे दर निश्चित केले आहेत. या वीज दर आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत-

१. केंद्राला लागणा-या वार्षिक महसूलाच्या आधारे निश्चित केलेल्या औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या वीज दरामध्ये स्थिर व अस्थिर खर्चाचा समावेश आहे. आयोगाने महानिर्मिती कंपनीची आर्थिक वर्ष २००५-०६ करिता वार्षिक महसूलाची गरज देखील निश्चित केली आहे.

२. जल-विद्युत तिच्या अंगभूत रचनेमुळे अल्पसूचनेने उपलब्ध करुन देणे शक्य असते आणि कमाल मागणीच्या काळात महागडी वीज खरेदी करण्याची गरज राहत नसल्यामुळे, यंत्रणेवर होणारा एकूण खर्च कमी होण्यास मदत देखील होते. त्यामुळे, जल-विद्युत, या दुर्मिळ स्त्रोताचा वापर, उच्च मागणीच्या काळात जास्तीत जास्त करता यावा यासाठी, आयोगाने जल विद्युत केंद्रांकरिता कमाल मागणी वीज दर (पीकींग टॅरिफ) लागू करण्याचे ठरविले आहे. त्याच वेळी, महा निर्मिती कंपनीला ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक परतावा मंजूर न करुन, कमाल मागणी वीज दराची अंमलबजावणी होत असताना, प्रत्यक्ष ग्राहकांना अतिरिक्त खर्च सहन करावा लागणार नाही, याची आयोगाने काळजी घेतली आहे.

३. महानिर्मिती कंपनीने सादर केलेल्या अंदाजित खर्चाच्या आधारे न्यू पारस आणि न्यू परळी ( प्रत्येकी २५० मेगावॅट) या नवीन विद्युत केंद्रांच्या वीज दरांना आयोगाने तात्पुरती मान्यता दिली आहे. व्यापारी तत्त्वावर कार्यान्वित झाल्यावर या केंद्रांच्या वीज दरांना, उचित नियामक प्रक्रियेद्वारा, अंतिम मान्यता देण्यात येईल.

४. महानिर्मिती कंपनीच्या सर्व वीज निर्मिती केंद्रांची आर्थिक वर्ष २००५-०६ मधील प्रत्यक्ष वीज निर्मिती ४६,५३२ दशलक्ष युनिट्सवरुन आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये ४९,५७५ दशलक्ष युनिट्स इतकी वाढेल, असे आयोगाने अंदाजित केले आहे. यामध्ये, आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये कार्यान्वित होणा-या न्यू पारस आणि न्यू परळी या दोन नवीन वीज केंद्राच्या १,४२३ दशलक्ष युनिटच्या अतिरिक्त वीज निर्मित्तीचाही समावेश आहे.

५. आयोगाने महानिर्मिती कंपनीच्या वार्षिक महसूलाची गरज निश्चित करताना संबधित विनियमांतर्गत पध्दत व कार्यक्षमतेचे निकष लागू केले आहेत. तथापि, महानिर्मिती कंपनीचे संयंत्र जुने झाले असल्याची बाब आवश्यक असेल तेथे आयोगाने यथोचितपणे विचारात घेतली आहे.

६. महानिर्मिती कंपनीच्या आर्थिक वर्ष २००५-०६ च्या वार्षिक महसूली गरजेच्या अंदाजित रकमेतून आयोगाने रु. ९०९ कोटी कमी केले असून त्यांची वार्षिक महसूली गरज म्हणून रु. ६,५५६ कोटी इतक्या रकमेस आयोगाने मान्यता दिली आहे. याचाच अर्थ असा की, आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये महावितरण कंपनीकरिता महानिर्मिती कंपनीच्या विजेचा निव्वळ खर्च प्रति युनिट रु. १.४१ इतका असेल.

७. आर्थिक वर्ष २००६-०७ च्या महानिर्मिती कंपनीच्या अंदाजित वार्षिक महसूली गरजेमधून आयोगाने रु.१,३१७ कोटी कमी केले असून त्यांची रु. ७,१६३ कोटीची वार्षिक महसूली गरज आयोगाने मंजूर केली आहे. याचाच अर्थ असा की, आर्थिक वर्ष

२००६-०७ मध्ये महावितरण कंपनीकरिता महानिर्मिती कंपनीच्या विजेचा निव्वळ खर्च प्रति युनिट रु. १.४५ इतका असेल.

८. आर्थिक वर्ष २००६-०७ करिता महानिर्मिती कंपनीचा इंधन खर्च रु. ५,२४१ कोटी इतका मान्य करण्यात आला असून तो त्यांच्या एकूण वार्षिक महसूल गरजेच्या ७३ टक्के आहे. वार्षिक महसूल गरजेची उरलेली रक्कम रु. १,९२२ कोटी ही वीज निर्मिती केंद्रांच्या स्थिर खर्चाची आहे. आर्थिक वर्ष २००५-०६ करिता हे आकडे अनुक्रमे रु. ४,८८० आणि रु. १,६७६ कोटी आहेत. स्थिर खर्चामध्ये महानिर्मिती कंपनीला आर्थिक वर्ष २००६-०७ करिता रु. ३७७ कोटी आणि २००५-०६ करिता रु. १५९ कोटीच्या खात्रीशीर परताव्याचा समावेश आहे.

९. ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठ्याची खात्री मिळावी याकरिता आयोगाने महानिर्मिती कंपनीस त्यांच्या सर्व वीज निर्मिती केंद्रांची दुरुस्ती व देखभालीची कामे तातडीने पार पाडण्याचे निदेश दिले आहेत. दुरुस्ती व देखभालीची यापूर्वीची अपुरी कामे लक्षांत घेऊन आयोगाने महानिर्मिती कंपनीला दुरुस्ती व देखभालीकरिता आदेशामध्ये मंजूर केलेल्या रकमेपेक्षा फक्त अनावर्ती बाबींच्या आधारे, आयोगाच्या पूर्व-संमतीने अधिक खर्च करण्यास मूभा दिली आहे.

प्रकरण क्र. २००५/४८ मधील दिनांक ७ सप्टेंबर, २००६ चा सविस्तर आदेश उतरवून घेण्याच्या स्वरुपात आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(मालिनी शंकर)
सचिव,
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**दिनांक- ७ सप्टेंबर, २००६**